# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

**५८३/ब, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे ३७.**

जाहिरात क्र. मरावम/आस्थापना/१/२०१०

दिनांक : १३ जानेवारी,२०१०

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांचे अधिपत्याखालील विविध वखारकेंद्रे / विभागीय कार्यालय / मुख्य कार्यालय येथे खालील रिक्त पदे भरण्याकरिता खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात एम.के.सी.एल. (M.K.C.L) या संस्थेमार्फत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ क्र | पदनाम | वेतनश्रेणी रुपये ★★ (असुधारीत वेतनश्रेणी) | किमान शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट | दि. ०१/०१/१० रोजी कमाल वयो-मर्यादा ★ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ साठा अधिक्षक | ४०००-१००-६००० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.सी.ए/ बी.सी.एम./बी.सी.एस. किंवा संगणक शास्त्रातील तत्सम् पदवी. यापेक्षा या विद्याशाखेतील उच्च शैक्षणिक पात्रता जसे उदा. बी.ई/ बी.टेक/ एम.सी.ए./ एम.सी.एम/एम.सी.एस.इ. धारण करणारे उमेदवार देखील अर्ज करु शकतील. | **एकूण २४**<br>१२ निवड यादी | २-अजा /१-अज /<br>१-विजा(अ) /<br>१-भज(क)/<br>२-इमाव /<br>५-खुला | ३३ वर्षे |
| | | | | १२ प्रतिक्षा यादी | १-अजा/१-अज/<br>१-भज(ब) /<br>१-भज(ड)/<br>१-विमाप्र/ २-इमाव/<br>५ खुला | |
| २ | वरिष्ठ सहायक | ४०००-१००-६००० | मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.सी.ए/ बी.सी.एम./बी.सी.एस. किंवा संगणक शास्त्रातील तत्सम् पदवी. यापेक्षा या विद्याशाखेतील उच्च शैक्षणिक पात्रता जसे उदा. बी.ई/ बी.टेक/ एम.सी.ए./ एम.सी.एम/एम.सी.एस इ. धारण करणारे उमेदवार देखील अर्ज करु शकतील. | **एकूण ०६**<br>निवड यादी | १-अजा/<br>१-अज/<br>१-भज(क)/<br>१-इमाव/<br>२ खुला | ३३ वर्षे |
| ३ | भांडारपाल | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १० वी इयत्ता उत्तीर्ण आणि शासकीय तंत्रशिक्षण मंडळाची संगणक क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान/ इलेक्ट्रॉनिकअॅन्ड टेलीकम्युनिकेशन/ संगणक शास्त्राची ३ वर्षाची पदविका. जसे उदा. डी.सी.एम/ डी.सी.ए/डी.आय.टी.इ. किंवा १२ वी उत्तीर्ण आणि शासकीय तंत्रशिक्षण मंडळाची संगणक शास्त्राची एक वर्षाची पदविका. यापेक्षा या विद्याशाखेतील उच्च शैक्षणिक पात्रता जसे उदा. बी.ई/ बी.सी.ए./बी.सी.एस. इ. धारण करणारे उमेदवार देखील अर्ज करु शकतील. | **एकूण ७०**<br>३५ निवड यादी | २-अजा/ १-अज/<br>२-भज(ब)/<br>१-भज(ड)/<br>१-विमाप्र/<br>७-इमाव/<br>२१-खुला | ३३ वर्षे |
| | | | | ३५ प्रतिक्षा यादी | ३-अजा/ १-अज/<br>१-भज(ब)/<br>२-भज(ड )/<br>८-इमाव/<br>२०-खुला | |
| ४ | सहायक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १० वी इयत्ता उत्तीर्ण आणि शासकीय तंत्रशिक्षण मंडळाची संगणक क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान/ इलेक्ट्रॉनिकअॅन्ड टेलीकम्युनिकेशन/ संगणक शास्त्राची ३ वर्षाची पदविका. जसे उदा. डी.सी.एम/ डी.सी.ए/डी.आय.टी इ. किंवा १२ वी उत्तीर्ण आणि शासकीय तंत्रशिक्षण मंडळाची संगणक शास्त्राची एक वर्षाची पदविका. यापेक्षा या विद्याशाखेतील उच्च शैक्षणिक पात्रता जसे उदा. बी.ई./बी.सी.ए./बी.सी.एस. इ. धारण करणारे उमेदवार देखील अर्ज करु शकतील. | **एकूण १६**<br>८ निवड यादी | १-अजा/ १-अज/<br>१-भज(ब)/<br>१-इमाव/<br>४ खुला | ३३ वर्षे |
| | | | | ८ प्रतिक्षा यादी | १-अजा/<br>१-विजा(अ)<br>२-इमाव/<br>४-खुला | |

★★वेतनश्रेणी ६ व्या वेतनआयोगाच्या शिफारशीनुसार सुधारण्यास योग्य.

**अटी :**

१) वयोमर्यादा : ★

अ) मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथीलक्षम राहील.

ब) वखार महामंडळातील पात्र खुल्या गटातील कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा ४० वर्षे आणि राखीव गटातील कर्मचाऱ्यांसाठी ४५ वर्षे राहील.

२) अर्ज करताना उमेदवारांनी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी शालान्त परीक्षेच्या उत्तीर्ण प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

३) शासन आदेशानुसार महिला व अपंग यांच्यासाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय राहील.

४) उपरोक्त पदावर महामंडळाच्या सेवेत नियुक्त होणारा उमेदवार महामंडळाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही केंद्रावर/कार्यालयात बदली योग्य राहील.

५) आरक्षित पदांकरिता निवड झालेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र शासन नियमाप्रमाणे विहित मुदतीत सादर करणे बंधनकारक राहील, अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द ठरविण्यात येईल.

६) उमेदवार महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

७) आवश्यकता भासल्यास लेखी परिक्षा वस्तुनिष्ठ पध्दतीने सामान्य ज्ञान, चालू घडामोडी, इंग्रजी, बुध्दिमत्ता चाचणी व संगणकाचे दैनंदिन वापरा विषयीचे ज्ञान यावर आधारीत राहील.

८) आवश्यकता भासल्यास लेखी परिक्षा पुणे, नागपूर, औरंगाबाद, सोलापूर या चार ठिकाणी घेण्यात येईल. उमेदवारांनी त्यांच्या पसंतीचे उपरोक्त चार ठिकाणापैकी एक ठिकाण अर्ज भरतांना नमुद करणे आवश्यक आहे.

९) लेखी परीक्षेस बसण्यासाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेचा दिनांक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती M.K.C.L च्या संकेतस्थळावर (Website) उपलब्ध राहील.

१०) निवड झालेल्या उमेदवारांना सेवेत रूजू होईपर्यंत मराठी देवनागरी लिपीमध्ये संगणकावर काम करण्याचे ज्ञान संपादन करणे आवश्यक राहिल.

११) परीक्षेसाठी विहित केलेला नमुना अर्ज व सविस्तर माहिती, M.K.C.Lच्या http://oasis.mkcl.org/mswc या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. उमेदवारांना M.K.C.L च्या महाराष्ट्रातील विविध ठिकाणी असलेल्या केंद्रावर (सदरहू केंद्राची यादी वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे) जाऊन सुध्दा संकेतस्थळावर अर्ज भरता येऊ शकेल. उमेदवाराने संकेतस्थळावर पूर्ण भरलेल्या अर्जाची छापील प्रत घ्यावी आणि तो अर्ज आवश्यक कागदपत्रे, छायाचित्र व डी.डी.सह खालील पत्त्यावर पोस्टाने पाठवावा किंवा समक्ष जाऊन सादर करावा. संकेतस्थळावर अर्ज भरण्याची शेवटची तारीख **२८/०१/२०१०** असून पूर्ण भरलेला अर्ज सर्व आवश्यक प्रमाणपत्रासह व विहित फी सह दिनांक **०३/०२/२०१०** सायंकाळी **५.०० वाजेपर्यंत** खालील पत्त्यावर पोहचणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित M.K.C.L**
४१२/बहिरट पाटील चौक, गोखले रोड,
शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६

१२) **प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे.** प्रत्येक अर्जासाठी सर्वसाधारण (खुल्या प्रवर्गातील) उमेदवारांनी रु. ४००/- (अक्षरी रुपये चारशे फक्त) व मागासवर्गीय उमेदवारांनी रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त) परीक्षा शुल्क M.K.C.L. Pune यांचे नावाने पुणे येथे देय असणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (D.D.) त्याच्या पाठीमागे स्वतःचे नांव व पत्ता लिहून अर्जासोबत जोडावा.

१३) महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र. एसआरव्ही २०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक १/७/२००५ अन्वयें वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दिनांक २८/३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा विचार करण्यात येणार नाही.

१४) अधिक माहितीसाठी **०२१६७-३०४२०४** या M.K.C.L च्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे**